महाराष्ट्र शासन

<u>सर्वप्राथम्य/तात्काळ</u>

**क्रमांक- जमीन-२०१७/प्र.क्र.६३/ज-१**
महसूल व वन विभाग, पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक :- ०९ जानेवारी, २०१८**

**प्रति,**

**(१) सर्व विभागीय आयुक्त.**
**(२) सर्व जिल्हाधिकारी.**

**विषय :-** **महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १८२ अन्वये कसूर करणा-या व्यक्तींकडून जप्त करून व्यवस्थापनाखाली घेतलेल्या जमिनींच्या बाबतीतील सुधारीत तरतूद आणि त्या अनुषंगिक नियम यांच्या अंमलबजावणीबाबत.**

संदर्भ :- १) शासन राजपत्र दि.२२/०८/२०१६ मध्ये प्रसिद्ध अधिनियम क्र.२७/ २०१६

२) कलम १८२ मध्ये उक्त अधिनियमान्वये करण्यात आलेल्या सुधारणे अनुषंगिक शासन राजपत्र दि.०१/०१/२०१८ मध्ये प्रसिद्ध नियम.

महोदय,

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-१८२ मध्ये, संदर्भाधीन क्र.१ येथे नमूद सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२७ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. कसूर करणाऱ्या व्यक्तींच्या स्थावर मालमत्ता अनेक ठिकाणी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-१८२ अन्वये जप्त करुन जिल्हाधिकाऱ्यांच्या व्यवस्थापनाखाली घेतलेल्या आहेत. सदर सुधारीत तरतूदीच्या अंमलबजावणी अनुषंगाने अशा जमिनी मूळ मालकांना अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांना परत करण्यासाठी जमिनीचा संभाव्य वापर विचारात घेऊन दंड व खंड याची रक्कम विहीत करण्यासाठीचे नियम शासन राजपत्रात दि.०१/०१/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. सुलभ संदर्भाकरीता उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधीन अधिनियम आणि नियम यांच्या शासन राजपत्राच्या प्रती सोबत जोडलेल्या आहेत. सदरहू अधिनियम तसेच नियमान्वये आवश्यक ती कार्यवाही सत्वर करण्यात यावी.

उक्त नमूद कलम १८२ मधील तरतूदी आकृष्ट होत नसलेल्या प्रकरणांत "आकारी पड " असा उल्लेख अधिकार अभिलेखात असल्यास, अशा जमिनींच्या बाबतीतील प्रकरणांत विषयांकित तरतूदींचा वापर करण्यात येऊ नये.

राजेंद्र क्षीरसागर
**( राजेंद्र क्षीरसागर )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

*सोबत :- वरीलप्रमाणे.*

**प्रत:- माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरीता अग्रेषित,**

**१.** सर्व जिल्हाधिकारी.
**२.** सर्व सहसचिव/उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
**३.** निवडनस्ती (ज-१)

C:\Users\abhay.homkar\Desktop\१८२.docx

Scanned by CamScanner

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक १ (२)] सोमवार, जानेवारी १, २०१८/पौष ११, शके १९३९ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

## असाधारण क्रमांक २

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

पहिला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जानेवारी २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक जमीन-२०१७/प्र.क्र.६३/ज-१.—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) च्या कलम १८२ च्या पोट-कलम (५) च्या परंतुकातील खंड (दोन) आणि (तीन) अन्वये तसेच कलम ३२८, च्या पोट-कलम (१) अन्वये महाराष्ट्र शासनास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व याबाबत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १८२ मधील तरतुदीच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र शासन पुढील नियम करीत आहे, हे नियम उक्त संहितेच्या कलम ३२९, पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत :—

**नियम**

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांना महाराष्ट्र जमीन महसूल (जप्त केलेली आणि जिल्हाधिकारी यांच्या व्यवस्थेखाली आणलेली स्थावर मालमत्ता परत करणे) नियम, २०१७ असे म्हणावे.

२. (१) **व्याख्या.**—(१) या नियमामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(एक) " अधिनियम " याचा अर्थ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ असा आहे ;

(दोन) " कलम " याचा अर्थ अधिनियमातील कलम असा आहे ;

(तीन) " जमिनीचे बाजारमूल्य " याचा अर्थ अधिनियमाच्या कलम १८२ च्या पोट-कलम (५) च्या परंतुकाच्या स्पष्टीकरणात व्याख्या केल्याप्रमाणे जमिनीचे बाजारमूल्य, असा आहे.

(२) या नियमात वापरलेले, परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमांमध्ये अनुक्रमे नेमून दिल्याप्रमाणेच अर्थ असेल.

३. **आकारावयाच्या वार्षिक खंडाची रक्कम.**— कसूर करणारी व्यक्ती अथवा त्यांच्या वारसाकडून जप्त करण्यात आलेली जमीन, अशी कसूर करणारी व्यक्ती अथवा त्यांच्या वारसास परत करताना कलम १८२ च्या पोट-कलम (५) खालील परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये आकारावयाच्या वार्षिक खंडाची रक्कम खालीलप्रमाणे असेल :—

(एक) संबंधित जमिनीचा शेती प्रयोजनासाठीचा वापर असल्यास, अशा जमिनीच्या बाजारमूल्याच्या ०.१ टक्के इतका खंड;

(दोन) संबंधित जमिनीचा निवासी वापर असल्यास, अशा जमिनीच्या बजारमूल्याच्या ०.२ टक्के इतका खंड;

(तीन) संबंधित जमिनीचा निवासी प्रयोजनाव्यतिरिक्त कोणताही अकृषिक वापर असल्यास, अशा जमिनीच्या बाजारमूल्याच्या ०.३ टक्के इतका खंड.

४. **आकारावयाच्या दंडाची रक्कम.**— कसूर करणारी व्यक्ती अथवा त्यांच्या वारसाकडून जप्त करण्यात आलेली जमीन, अशी कसूर करणारी व्यक्ती अथवा त्यांच्या वारसास प्रत्यार्पित करताना कलम १८२ च्या पोट-कलम (५) खालील परंतुकाच्या खंड (*iii*) अन्वये आकारावयाच्या दंडाची रक्कम खालीलप्रमाणे राहील :—

(एक) संबंधित जमीन ग्रामीण क्षेत्रात, किंवा नगरपंचायत क्षेत्रात किंवा प्रारूप अथवा मंजूर प्रादेशिक योजना क्षेत्रात, शेती किंवा ना-विकास वापर विभागात असल्यास, अशा जमिनीच्या बाजारमूल्याच्या २०% रक्कम.

(दोन) संबंधित जमीन प्रारूप अथवा मंजूर प्रादेशिक योजना क्षेत्रात, अकृषिक स्वरुपाच्या वापर विभागात असल्यास, अशा जमिनीच्या बाजारमूल्याच्या ३५% रक्कम.

(तीन) संबंधित जमीन महानगरपालिका किंवा नगरपरिषद क्षेत्रात, प्रारूप अथवा मंजूर विकास आराखडा क्षेत्रात असल्यास, अशा जमिनीच्या बाजारमूल्याच्या ५०% रक्कम.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र क्षीरसागर,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 1st January 2018

*NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. Jamin-2017/C.R.63/J-1.—In exercise of the powers conferred by clauses (*ii* ) and (*iii*) of proviso to sub-section *(5)* of section 182 and sub-section (*1*) of section 328 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah.XLI of 1966), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules for implementation of section 182 of the Maharashtra Land Revenue Code, 1966, the same having been published previously as required by sub-section (*1*) of section 329 of the said Code, namely :—

*RULES*

1. *Short title*.— These rules may be called the Maharashtra Land Revenue (Restoration of land attached and brought under management of Collector) Rules, 2017.

2. *Definations.* (1) In this rule, unless the context otherwise requires,—

(*i*) "Act" means the Maharashtra Land Revenue Code,1966 (Mah.XLI of 1966);

(*ii*) "section" means the section of the Act;

(*iii*) "market value of land" means the market value of land as defined in *Explanation* to proviso to sub-section *(5)* of section 182 of the Act.

(2) Words and expressions used herein but not defined in these Rules shall have the same meaning as respectively assigned to them in the Act.

3. *Annual Lease rent to be levied*.— Annual lease rent to be levied, on the defaulter or his heirs, while restoring attached land to defaulter or his heirs, under clause (*ii*) of proviso to sub-section (*5*) of section 182 shall be, as follows, namely :—

(*i*) 0.1 per cent. of the market value of the land, if such land is used for agricultural purpose;

(*ii*) 0.2 per cent. of the market value of the land, if such land is used for residential purpose ;

(*iii*) 0.3 per cent. of the market value of the land, if such land is used for any non-agricultural purpose, other than residential purpose.

4. *Penal amount to be levied*.— The penal amount levied, on the defaulter or his heirs while restoring attached land to defaulter or his heirs, under clause (*iii*) of proviso to sub-section (*5*) of section 182 shall be, as follows, namely :—

(*i*) 20 per cent. of the market value of the land, if such land is situated in rural area or within the limits of any *Nagar Panchayat*, or in any area allocated to Agricultural or No Development Zone in the Draft or Final Regional Plan.

(*ii*) 35 per cent. of the market value of the land, if such land is allocated to any non-agricultural use in the Draft or Final Regional Plan.

(*iii*) 50 per cent. of the market value of the land, if such land is situated within the limits of a Municipal Corporation or Municipal Council, or is situated in an area for which Draft or Final Development Plan has been notified.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA KSHIRSAGAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.